**PRESS MONITOR**

Publication : Saanjsamachar
Edition : Pune
Date : March 07, 2018

# मूनबो तर्फे अल्फीअस यूव्ही + यूएफ वॉटर प्युरिफायर

पुणे : मूनबोने भारतातील सर्वात शक्तीशाली यूव्ही वॉटर प्युरिफायर्समधील अल्फीअस यूव्ही+यूएफ हा वॉटर प्युरिफायर लाँच करून आपल्या उत्पादन श्रेणीचा विस्तार केला आहे. ९,४९०/- रुपये किमतीच्या या वॉटर प्युरिफायरला टीयूव्ही या जगविख्यात जर्मन प्रमाणीकरण प्रयोगशाळेचे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. ॲल्युमिनिअमपासून तयार करण्यात आलेला सामान्य वॉटर प्युरिफायर एक लिटर पाण्यातून एक कोटी सुक्ष्मजीव वेगळे काढू शकतो, तर अल्फीअसमध्ये एक लिटर पाण्यातून १०० कोटी सुक्ष्मजीव वेगळे काढण्याची क्षमता आहे. पाण्यामध्ये विरघळलेल्या एकूण



घनपदार्थांची पातळी (टीडीएस पातळी) कमी असलेल्या भौगोलिक प्रदेशांसाठी अल्फीअस यूव्ही + यूएफ विशेषत्वाने तयार करण्यात आला आहे. कारण, अशा भागांत आरओ शुद्धीकरणामुळे पेयजलातील अत्यावश्यक क्षार नष्ट होतात आणि ते पाणी अनारोग्यकारक होते.

आरओ आधारित वॉटर प्युरिफायर्स पाण्यातील जड धातू आणि अन्य अशुद्ध घटकांसह अत्यावश्यक क्षारही पाण्यातून वेगळे काढतात. त्यामुळे टीडीएस पातळी कमी असलेल्या पाण्याचा पुरवठा होणाऱ्या भागात क्षार संरक्षण (मिनरल फोर्टिफिकेशन) तंत्रज्ञान नसलेले आरओ वॉटर प्युरिफायर्स वापरले जातात, तेव्हा शुद्ध केलेल्या पाण्यातील क्षारांचे प्रमाण मानवी शरीराला आवश्यक प्रमाणाच्या तुलनेत कमी भरते.

याउलट, यूव्ही वॉटर प्युरिफायर्समध्ये टीडीएस पातळी कमी असलेल्या पाण्यातील सर्व आवश्यक नैसर्गिक क्षार कायम राखत अशुद्ध घटक काढून टाकण्याची क्षमता असते. यूव्हीला (अल्ट्रा व्हॉयलेट) यूएफची (अल्ट्रा फिल्ट्रेशन) जोड मिळाल्यास जीवाणू आणि पाण्यातील अन्य अशुद्ध घटकांपासून अतिरिक्त संरक्षण मिळते. म्हणूनच पाण्यातील टीडीएस पातळी कमी आहे अशा शहरांसाठी यूव्ही + यूएफ वॉटर प्युरिफायर आदर्श आहे.

एचएसआयएल लिमिटेडचे अध्यक्ष आणि ग्राहकोपयोगी उत्पादन विभागाचे प्रमुख श्री. राकेश कौल म्हणाले, औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यांचा परिणाम म्हणून जलप्रदूषणाच्या पातळीत जलद गतीने वाढ झाली आहे आणि त्यामुळे पाण्याद्वारे होणाऱ्या आजारांचे प्रमाणही वाढले आहे. अशा परिस्थितीत वॉटर प्युरिफायर ही मूलभूत गरज झाली आहे. याचा परिणाम म्हणून भारतातील वॉटर प्युरिफायर्सची बाजारपेठ आज ४५०० कोटी रुपयांची आहे आणि त्यात २० टक्क्यांनी वाढ होणे अपेक्षित आहे.

ते पुढे म्हणाले, ग्राहकांना बहुतेकदा असे वाटते की आरओ वॉटर प्युरिफायर्स हा सर्वोत्तम पर्याय आहे. खरे तर प्रत्येकाने वॉटर प्युरिफायर खरेदी करण्यापूर्वी पाण्यातील टीडीएसची पातळी तपासून घेतली पाहिजे आणि त्याप्रमाणे वॉटर प्युरिफायर निवडला पाहिजे. पाण्यातील टीडीएस पातळी कमी आहे अशा भागांत यूव्ही वॉटर प्युरिफायर्स सर्वाधिक अनुकूल आहेत. कारण, ते पाण्यातील नैसर्गिक क्षारांचे प्रमाण कायम राखण्यात मदत करतात.